महाराष्ट्र शासन स्थापीत
नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,नागपूर
( कार्यक्षेत्र नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा )
लोटस प्लॅझा, प्लॅाट नं- १, २ पहीला माळा, जुने व्ही.सी.ए. स्टेडीयमचे समोर सिव्हील लाईन, नागपूर ०१
Constituted under Section ६ of the Maharashtra Private Security Guard (Regulation of employment and Welfare) Act, १९६९
दुरध्वनी क्रंमाक -२५६०८६२, २५५७१४२, २५५७४०५
Email-ndsgbnagpur@gmail.com

---

पत्र क्रं./नाजिसुरम/नाग/वेतननिश्चिती आदेश / २०२८ /२०२३ दिनांक : ९ जुन, २०२३

# आ दे श

विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक / अधिकारी यांचे वेतन व भत्त्यामध्ये दि. १ मे २०२३ पासुन सुधारणा करणे बाबत.

संदर्भ :- अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रंमाक एसजीए-२०२१/प्र.क्र. ८५/काम-५ दि. २.५.२०२३

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते निश्चित करण्याबाबत, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० चे उपखंड (२) मधील तरतुदी नुसार मंडळास अधिकार प्रदान करण्यांत आले आहेत. सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यासाठी मंडळाने किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना मधील कामगारांना लागू असलेले किमान वेतनाचे दर हे आधारभुत प्रमाण मानण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार सदर अनुसुचित उद्योगधंद्यामधील कामगारांसाठी शासनातर्फे वेळोवेळी जाहीर होणारा विशेष भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना अदा करण्यांत येतो. त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधित्व करणा-या सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेल्या मागणी नुसार सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वेळोवेळी वाढ करण्यांत आलेली आहे.

मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ करण्यासाठी विविध सुरक्षा रक्षक संघटनांनी निवेदनाद्वारे केलेल्या मागणी संदर्भात मंडळाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण ) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० चे उपखंड (२) मधील तरतुदी नुसार, मंडळाने दि. ७.१.२०२३ रोजी लोकमत, नवभारत व हितवाद या दैनीक वृत्तपत्रामध्ये जाहीर सुचना प्रसिध्द करुन सुरक्षा रक्षकांची प्रस्तावीत वेतनवाढ जाहीर केलेली होती व सदर जाहीर सुचनेद्वारे नागपूर, भंडारा, गोंदीया व वर्धा जिल्हा कार्यक्षेत्रामधील मुख्य मालकांच्या विविध संघटना / असोसिएशन्स व सुरक्षा रक्षक आणि त्यांच्या कामगार संघटना यांना सदर जाहीर सुचनेमधील प्रस्तावित केलेल्या वेतनवाढीबाबत आपल्या काही सुचना व हरकती असल्यास मंडळास एक महिन्याचे आत सादर करण्यांचे आवाहन करण्यांत आले होते.

मुख्य मालक / प्रमुख नियोक्ता व सुरक्षा रक्षक संघटना यांनी मंडळास प्रस्तावीत केलेल्या वेनवाढीच्या अनुषंगाने मंडळास प्राप्त झालेल्या सुचना व हरकती विचारात घेवुन मंडळात नोंदीत मुख्य मालक / असोसिएशन तसेच सुरक्षा रक्षक व सुरक्षा रक्षक संघटना यांची दि. १ मार्च, २०२३ रोजी मंडळाचे कार्यालयात संयुक्त बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीत दोनही पक्षांचे म्हणणे ऐकुन घेतले, व त्यानुसार मंडळाने दि. २८.०४.२०२३ रोजी सुरक्षा रक्षकांचा वेतनवाढी बाबतचा सुधारीत प्रस्ताव पाठविला होता.

सदर प्रस्तावास अनुसरुन शासनाने मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्याच्या वाढीबावत मंडळास अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमाक एसजीए-२०२१/प्र.क्र. ८५/काम-५ दि. २.५.२०२३ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. सोबत पत्राची प्रत जोडलेली आहे. शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये सुधारणा करण्याबावत मंडळाने दि. ८.६.२०२३ रोजी एकसदस्यीय मंडळामध्ये ठरावाद्वारे निर्णय घेतला असुन सुधारीत वेतन व भत्ते १ मे, २०२३ पासुन पुढील तीन वर्षा करीता खालील प्रमाणे निश्चित करण्यांत आलेले आहेत.

## १. मुळ वेतन

| अ.क्र. | पदनाम | सुधारीत मुळ वेतनाचे दर |
|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक | १२९८४.०० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | १३२५९.०० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | १३९५९.०० |
| ४. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | १४१८४.०० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | १४६३४.०० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५०८४०० |
| ७. | माजी सैनीक सुरक्षा पर्यवेक्षक | १७०५४.०० |
| ८. | माजी सैनीक सुरक्षा रक्षक | १३२९४०० |

.. २

२. विशेष भत्ता : विशेष भत्ता : मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील दुकाने व व्यापारी संस्था अनुसूचीत रोजगारासाठी लागू असलेला महागाई भत्ता लागू राहील. सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८, मुंबई यांनी त्यांचे आदेश क्रं ग्रा-वि/किवेअ/वि.भ.-१/२०२३ दि. १.२.२०२३ अन्वये दर रु २४४४.०० ( १.१.२०२३ ते ३०.०६.२०२३ करिता ) निश्चित केला आहे.

३. घरभाडे भत्ता :- उपरोक्त किमान वेतना शिवाय (मुळ वेतन व विशेष भत्ता /महागाई भत्ता मिळुन ) मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षक / अधिका-यांना त्यांचे किमान वेतनावर पुर्वी प्रमाणेच २० टक्के घरभाडे भत्ता लागू करण्यांत आलेला आहे.

४. प्रवास भत्ता :- सर्व सुरक्षा रक्षक / अधिका-यांना रु ६००/- दरमहा इतका प्रवास भत्ता पुर्वी प्रमाणे लागू राहील.

५. धुलाई भत्ता :- सर्व सुरक्षा रक्षक / अधिका-यांना रु ६००/- दरमहा इतका प्रवास भत्ता पुर्वी प्रमाणे लागू राहील.

६. शैक्षणिक भत्ता :- सर्व सुरक्षा रक्षक / अधिका-यांना रु ६००/- दरमहा इतका इतका प्रवास भत्ता पुर्वी प्रमाणे लागू राहील.

७. सुरक्षा रक्षकांचे वेतनाची पध्दत ही सुरक्षा रक्षकांचे मुळ वेतन + विशेष भत्ता या मासिक वेतनदरास २६ ने भागुन येणारा भागाकार हा त्याचा प्रतिदिन वेतनदर समजावा.

८. नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळा मार्फत ज्या आस्थापनेत माजी सैनीक सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक कार्यरत आहेत त्यांना जी वेतनवाढ सिव्हील सुरक्षा रक्षकांच्या / पर्यवेक्षकांच्या वेतनात झाली आहे तीच वाढ माजी सैनीक सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक यांचे वेतनात होईल.

९. लेव्हीच्या दरात अथवा संरचनेत कोणताही बदल केलेला नसुन लेव्हीचे दर पुवी प्रमाणेच म्हणजे ( मुळ वेतन + विशेष भत्ता यावर ४३ टक्के राहतील.

नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांनी दि. ०१ मे २०२३ ते ३० एप्रील २०२६ ( तिन वर्षाकरीता ) वेतनाचे पुर्ननिर्धारण केले असुन ते खालील प्रमाणे आहे. ( मंडळाचे कार्यक्षेत्र -नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्हयाकरीता )

| अ.क्र | पदनाम | मुळ वेतन (१.५.२०२३ पासुन ) | विशेष भत्ता दि. १.१.२०२३ पासुन | मुळ वेतन + विशेष भत्ता | घरभाडे भत्ता २० टक्के (मुळ वेतन + विशेष भत्ता ) | प्रवास भत्ता दरमहा रु ६०० | धुलाई भत्ता दरमहा रु ६०० | शैक्षणीक भत्ता दरमहा रु ६०० | एकुण वेतन | देय लेव्ही ४३ टक्के | वेतन व लेव्ही मिळून एकुण रक्कम ( २६ दिवस) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सूरक्षा रक्षक / महिला सुरक्षा रक्षक | १२९८४.०० | २४४४.०० | १५४२८.०० | ३०८६.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २०३१४.०० | ६६३४.०० | २६९४८.०० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | १३२५९.०० | २४४४.०० | १५७०३.०० | ३१४१.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २०६४४.०० | ६७५२.०० | २७३९६.०० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | १३९५९.०० | २४४४.०० | १६४०३.०० | ३२८१.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २१४८४.०० | ७०५३.०० | २८५३७.०० |
| ४. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | १४१८४.०० | २४४४.०० | १६६२८.०० | ३३२६.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २१७५४.०० | ७१५०.०० | २८९०४.०० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | १४६३४.०० | २४४४.०० | १७०७८.०० | ३४१६.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २२२९४.०० | ७३४४.०० | २९६३७.०० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५०८४.०० | २४४४.०० | १७५२८.०० | ३५०६.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २२८३४.०० | ७५३७.०० | ३०३७१.०० |
| ७. | माजी सैनीक सुरक्षा पर्यवेक्षक | १७०५४.०० | २४४४.०० | १९४९८.०० | ३९००.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २५१९८.०० | ८३८४.०० | ३३५८२.०० |
| ८. | माजी सैनीक सुरक्षा रक्षक | १३२९४.०० | २४४४.०० | १५७३८.०० | ३१४८.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २०६८६.०० | ६७६७.०० | २७४५३.०० |

लेव्हीची विगतवारी खालील प्रमाणे

| अ.क्र. | लेव्ही शिर्षक | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | भविष्य निर्वाह निधी | १२% |
| २. | सानुग्रह अनुदान | ८.३३% |
| ३. | उपदान | ४% |
| ४. | आस्थापना खर्च | ५.००% |
| ५. | सवेतन सुट्टी | १.२५% |
| ६. | वैद्यकीय खर्च | ४.००% |
| ७. | कामगार क्षतीपुर्ती (नुकसान भरपाई) | ०.७५% |
| ८. | कॉपर्स फंड (राखीव निधी) | ०.६७% |
| ९. | सुट्टया रजा | ४% |
| १०. | गणवेश | ३% |
| | एकुण | ४३% |

टिप :- १. उपरोक्त प्रतिदिन दर हे २६ दिवसाचे आहे, साप्ताहीक सुटीचे दिवसाकरीता रीलीवर पाठविल्यास त्याचे प्रतिदिन दरानुसार वेतन देय राहील.

२. शासनातर्फे जानेवारी व जुलै महिन्यामध्ये किमान अधिनियमानुसार विशेष भत्त्यामध्ये झालेली वाढ होते ती आपणांस देय राहील

कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम, १९४८ अतंर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील कामगारांसाठी वेळोवेळी प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै या महिन्यात नमुद केलेला विशेष भत्ता /महागाई भत्ता मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षकांना त्यांना तैनात करणा-या त्यांच्या मुख्य मालकांना देणे बधंनकारक राहील.

तसेच भविष्यात दुकाने व संस्था या अनुसूची उद्योगातील किमान वेतनाचे पुर्ननिर्धारण झाल्यास व ते किमान वेतन प्रस्तावीत वेतनापेक्षा जास्त असल्यास पुर्ननिर्धारीत दिनांकापासुन दुकाने व आस्थापना या अनुसूची उद्योगाचे वेतन सुरक्षा रक्षकास त्या त्या वर्गवारीप्रमाणे लागू होईल.

सबब मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा रक्षक / अधिकारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे १ मे, २०२३ पासुन सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

( ऊ.सु. लोया )
सहाय्यक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष
नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ
नागपूर

प्रति,

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र - ०२२-२२७९३८७३ Email Id :Labour५.ield@mah.gov.in

क्रमांक :-एसजीए २०२१/प्र.क्र.८५/काम-५ दिनांक :-०२/०५/२०२३

प्रति,

कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्त्यात वाढ करण्याबाबत
संदर्भ :- १. सह आयुक्त (माथाडी) यांचे क्र. सुरक्षा/कार्या-१४/२०२३/४० दि.२९.०३.२०२३ रोजीचे पत्र
२. सह आयुक्त (माथाडी) यांचे क्र.सुरक्षा/वेतनवाढ प्रस्ताव/२०२३/कार्या-१४/४७ दि.१३.०४.२०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

संदर्भाधीन क्र.१ व क्र. २ च्या पत्रान्वये सह आयुक्त (माथाडी) यांचे कडुन सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्ते यामध्ये वाढ करणेबाबत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर वेतन व भत्ते यामध्ये वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती सह आयुक्त (माथाडी) यांनी केलेली आहे. मला आपणांस असे कळविण्याचे आदेश आहेत की, आयुक्तांचा प्रस्ताव तसेच त्यासोबत विविध माथाडी मंडळांने सादर केलेले प्रस्तावांच्या अनुषंगाने १२ जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळास सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्ते यामध्ये ३ वर्ष कालावधीसाठी वाढ करण्यास खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मंडळाचे नाव | देय वेतनवाढ | लेव्हीची रक्कम | लेव्हीसह एकुण देय वेतनवाढ |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १३७५ | ६२२ | १९९७ |
| २ | रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १४०२ | ४६९ | १८७१ |
| ३ | पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १७७४ | ३५७ | २१३१ |
| ४ | नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १२४७ | ५११ | १७५८ |
| ५ | चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १२१३ | ५२२ | १७३५ |
| ६ | नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ११८० | ५०७ | १६८७ |
| ७ | सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १२९६ | ५४४ | १८४० |
| ८ | अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ७०० | २२४ | ९२४ |
| ९ | अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १३४२ | ५७७ | १९१९ |
| १० | औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १४२९ | ५७९ | २००८ |
| ११ | कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ८४१ | ३५३ | ११९४ |
| १२ | रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ५६० | २३५ | ७९५ |

आपला,

(दिलीप आ. वणिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

क्रं. सकाआ/सुरक्षा/सुधारीत वेतन/343/२०२३
चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय भवन, चंद्रपूर
Email-chandrapurmathadi@gmail.com
दिनांक :- २६.०५.२०२३

*** आ दे श ***

**विषय :- चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे (कार्यक्षेत्र चंद्रपूर गडचिरोली जिल्हा) नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व इतर भत्ते यामध्ये वाढ करणेबाबत.**

संदर्भ :- १. क्र. सकाआ/सुरक्षा/वेतन वाढ/८७१/२०२२ दि १७.१०.२०२२
२. शासन पत्र क्रमांक एसजीए२०२१/प्र.क्र. ८५/काम-५, दिनांक ०२/०५/२०२३

उपरोक्त शासन पत्र क्रमांक एसजीए२०२१/प्र.क्र. ८५/काम-५, दिनांक ०२/०५/२०२३ अन्वये १२ जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे वेतन व भत्ते यामध्ये ३ वर्षाकरीता वाढ करण्यास शासन मान्यता प्राप्त झालेली असुन चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या मुळ वेतनात रुपये १,२१३/- व त्यावर लेव्ही ४३% टक्केप्रमाणे ५२२/- अशी एकुण एकंदरीत वाढ केलेली आहे. मंडळाच्या पत्र क्र. सकाआ/सुरक्षा/वेतन वाढ/८७१/२०२२ दि १७.१०.२०२२ च्या प्रस्तावाप्रमाणे सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या प्रवास भत्ता, शैक्षणीक भत्ता व धुलाई भत्ता यामध्ये वाढ झालेली दिसुन येत नसुन त्याबाबत स्पष्टता नाही. तसेच सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ कधीपासुन करावयाची याबाबत ही स्पष्टता नसल्याने तुर्तास शासन पत्र क्रमांक एसजीए२०२१/प्र.क्र. ८५/काम-५, दिनांक ०२/०५/२०२३ अन्वये दिनांक ०१ मे २०२३ पासुन सुरक्षा रक्षकांचे मुळ वेतनात रुपये १२१३/- ची वाढ याबाबत शासनाचे वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेश निर्देशांस अधिन राहुण तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येते आहे.

चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत दिनांक ०१ मे २०२३ ते ३० एप्रील २०२६ या तिन वर्षाकरीता वेतनाचे दर पुर्ननिर्धारण केलेले असुन ते खालील प्रमाणे आहे. (चंद्रपूर गडचिरोली जिल्हयाकरीता)

**सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते दिनांक ०१/०५/२०२३ पासुन ३०.०६.२०२४**

| क्रं | पदनाम | मुळ वेतन | विशेष भत्ता | घरभाडे भत्ता १० टक्के दरमहा | प्रवास भत्ता दरमहा | धुलाई भत्ता दरमहा | शैक्षणीक भत्ता दरमहा | एकुण वेतन | देय लेव्ही ४३ टक्के | वेतन व लेव्ही मिळुन एकुण रक्कम (२६ दिवस) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक | ११,२३४/- | २४४४/- | १३६८/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १६८४६/- | ५८८२/- | २२७२७/- |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२,०६९/- | २४४४/- | १४५१/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १७७६४/- | ६२४१/- | २४४०५/- |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १२,८४५ | २४४४/- | १५२९/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १८६१८/- | ६५७४/- | २५१९२/- |

उपरोक्त दराव्यतीरीक्त सुरक्षा रक्षकांचे वेतनावर खालीलप्रमाणे मुख्य नियोक्त्यास लेव्ही देणे कायदेशीरदृष्टया बंधनकारक आहे. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सुचित करण्यात येते कि, त्यांनी मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे १ मे २०२३ पासुन वेतन व भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guard Board ★ CHANDRAPUR (M.S.) ★

(एम. पी. मडावी)
अध्यक्ष तथा
सहाय्यक कामगार आयुक्त,
चंद्रपूर

प्रत :- **माहिती तथा पुढील उचीत कार्यवाहीकरीता.**

D:\office data\SGB-sgb-fixation